MHKO030009462026

संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक १२३८/२०२६

निशाणी क्रमांक १ वरील आदेश

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १९७४ चा अधिनियम दोन प्रकरण एकवीस अन्वये संक्षीप्त संपरिक्षा केलेला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१३, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

| | | |
|---|---|---|
| १ | अपराध घडल्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | ०८/०९/२०२५ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | ०८/०९/२०२५ |
| ३ | फिर्यादीचे नाव व पत्ता | पोलिस निरिक्षक<br>शहर वाहतूक नियंत्रण शाखा, कोल्हापूर. |
| ४ | आरोपीचे नाव, वय व पत्ता | अजरुद्दीन बागवान,<br>रा. १०८१, सी वॉर्ड, बिंदू चौक, कोल्हापूर. |
| ५ | आरोपीला समजावून सांगणेचा तपशील | महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३(१)/१८१ , ११९/११७ प्रमाणे |

**<u>गुन्ह्याचा तपशिल</u>**

१) दि.०८/०९/२०२५ रोजी ११.११ वाजणेच्या सुमारास भवानी मंडम, कोल्हापूर येथे तुम्ही आपल्या ताब्यातील वाहन क्र. एमएच-०९-सीएक्स-१२६५ त्याचा विमा उतरविलेला नसताना तसेच वाहतुकीचे नियम डावलून चालविताना मिळून आलेने तुम्ही महाराष्ट्र पोलिस कायदा ३(१)/१८१, ११९/११७ प्रमाणे दंडनीय गुन्हा केला. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या दखलगिरीत घडला आहे.

आरोपीस आरोप वाचून दाखविणेत आला व समजाविणेत आला.

२) आरोपीचे प्रतिकथन :

प्र. १ तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर **होय**

प्र. २ दोषारोपातील आरोप तुम्हाला वाचून व समजावून सांगितले ते तुम्हाला समजले काय?

उत्तर **होय**

प्र. ३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर **मला गुन्हा कबूल आहे.**

आरोपीची सही

समोर,

( जी. डी. वंतरम )
पॅनेल प्रमुख व १३ वे प्रथमवर्ग
न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर

कोल्हापूर
दिनांक - ०९/०५/२०२६

आजरोजी सदरचे प्रकरण राष्ट्रीय लोकन्यायालयात ठेवणेत आले. सदरचा गुन्हा आरोपीने पहिल्याच तारखेला स्वेच्छेने कबूल केला आहे. आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. आरोपीने असे कथन केले की, आर्थिक परिस्थिती गरीबीचे असलेने कमीत कमी शिक्षा व्हावी. त्यामुळे अशा परिस्थितीत आरोपी यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप पाहता आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यांना दयाबुध्दी दाखविणे संयुक्तीक होणार आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१) आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३(१)/१८१, ११९/११७ प्रमाणे केलेल्या अपराधामध्ये दोषी धरणेत येत असून त्यांना रक्कम रुपये 1200 (अक्षरी बारा शे/- फक्त ) दंड व दंड न दिल्यास (१) दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा सुनावणेत येत आहे.

२) आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत मोफत देणेत यावी.

( जी. डी. वंतरम )
पॅनेल प्रमुख व १३ वे प्रथमवर्ग
न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर

कोल्हापूर
दिनांक - ०९/०५/२०२६

Fine Receipt No. 293
Fine Paid of Rs. 1200 /-
Rs. बाराशे Only 09/5/2026
एक हजार दोनशे रुपये फक्त

Jr. Clerk Asstt. Supdt.